# शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा जाने./ फेब्रवारी - २०१८

## गुणपडताळणी व उत्तरपत्रिका छायांकित प्रत मागणी अर्ज.

(Flow Chart)

www.mscepune.in वेबसाईटला भेट देऊन Login करा

⇓

Mark Verification/Xerox Copy Option बटनावर क्लिक करा

⇓

Checkout Result List

⇓

A) Click option Mark Verification if you want for appropriate Candidate.
B) Click option Xerox copy if you want for appropriate Candidate

⇓

Proceed to Payment वर Click करा.

⇓

स्क्रिनवर येणाऱ्या माहितीची खात्री करुन Pay Now बटनावर Click करावे.

⇓

Online payment च्या उपलब्ध पर्यायांपैकी सोयीस्कर पर्याय निवडावा.

⇓

आवश्यक माहिती अचूकपणे भरुन Make payment बटनावर Click करा.

⇓

OTP/ATM PIN अचूकपणे नमूद करुन Submit करा.

⇓

Print Payment Receipt

* टीप

१. जर उमेदवाराने गुणपडताळणीसाठी रु.१००/- अगोदर भरले असतील तर पुन्हा झेरॉक्स प्रतीची मागणी केल्यास पुन्हा ४००/- रु भरावे लागतील.

२. अर्जाची प्रत व शुल्क भरलेल्या पावतीची प्रत परिषदेकडे पाठवू नये.
उपरोक्त Flow Chart प्रमाणे कार्यवाही करावी.

३. Payment यशस्वीरित्या Paid झाले नाही, तर एका तासाने पुन्हा उपरोक्त Flow Chart प्रमाणे कार्यवाही करा.

४. यासाठी ब्रॉडबॅन्ड/3G/4G सेवेचा वापर करा.

महत्वाचे :
कालमर्यादित :

जा.क्र./मरापप/जीसीसी/मूल्य/२०१८/2138
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे -१
दिनांक :02/०४/२०१८.

प्रति,

संस्थाचालक,
सर्व शासनमान्य टंकलेखन व लघुलेखन संस्था,
महाराष्ट्र व गोवा राज्य.

विषय :- जी.सी.सी. परीक्षा जाने./फेब्रुवारी -२०१८
उत्तरपत्रिका छायाप्रती मिळणेबाबत व गुणपडताळणी करणेबाबत.

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, जी.सी.सी. परीक्षा जाने./फेब्रुवारी - २०१८ चा निकाल दिनांक ०२/०४/२०१८ रोजी परिषदेच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आलेला आहे. जी.सी.सी. परीक्षेबाबत प्रसिध्द केलेल्या अधिसुचनेनुसार विद्यार्थ्यांनी गुणपडताळणी करणेकरिता व उत्तरपत्रिका छायाप्रती प्राप्त करुन घेण्यासाठी दिनांक १२/०४/२०१८ पर्यंत उमेदवारांना टंकलेखन संस्थेमार्फत ऑनलाईन अर्ज विहित शुल्कासह (गुणपडताळणीसाठी प्रती विषय रु.१००/- व उत्तरपत्रिका छायाप्रती मिळण्यासाठी प्रती विषय रु.४००/-ऑनलाईन पध्दतीने) भरता येईल. दिनांक १२/०४/२०१८ नंतर प्राप्त होणा-या अर्जाचा व दिलेल्या दरानुसार शुल्क न भरलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. याबाबतच्या सविस्तर सूचना परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत याची नोंद घेण्यात यावी.

(सुखदेव डेरे)
**आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे - ४११ ००१**

**प्रतः माहितीस्तव व योग्यत्या कार्यवाहीस्तव**
**१. विभागीय शिक्षण उपसंचालक सर्व**
**२. शिक्षणाधिकारी (माध्य.) सर्व**

E/V.J. Chavansir/namuna nikal and press note

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.

## जी.सी.सी. परीक्षा जाने./ फेब्रुवारी - २०१८

### उत्तरपत्रिका छायाप्रत मिळण्याबाबतच्या महत्वाच्या अटी/ शर्ती व सूचना

१) विद्यार्थ्याला फक्त त्याच्या स्वत:च्याच उत्तरपत्रिकेची छायाप्रतीची मागणी करता येईल. यासाठी परीक्षा परिषदेकडे विहित पध्दतीने टंकलेखन संस्थेमार्फत ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.

२) निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून कमाल १० दिवसापर्यंत परिषदेकडे विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज करता येईल. मुदतीनंतर अर्ज भरता येणार नाही. तसेच अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

३) अर्जातील माहीती पूर्णपणे भरलेली असावी. अपुर्ण अर्ज सबमिट ( submit) होणार नाही.

४) उत्तरपत्रिका छायाप्रतीसाठी प्रतिविषय रु. ४००/- इतके शुल्क आकारण्यात येईल. एकदा भरलेले शुल्क कोणत्याही सबबीवर परत केले जाणार नाही.

५) शुल्क ऑनलाईन पध्दतीने संस्थेस Login द्वारे भरावे लागेल.

६) उत्तरपत्रिका छायाप्रत मिळविण्यासाठी रु. ४००/- इतके शुल्क भरतेचा विषयांच्या उत्तरपत्रिकांची गुणपडताळणी करण्यात येणार असल्याने गुणपडताळणीसाठी स्वतंत्र अर्ज करण्याची आवश्यकता असणार नाही.

७) मागणी केलेल्या उत्तरपत्रिकांची छायाप्रत विद्यार्थ्यांना अर्जात नमूद केल्याप्रमाणे संस्थेच्या पत्यावर पोस्टाने देण्यात येईल. अर्जावर भ्रमणध्वनी लिहिणे आवश्यक आहे.

८) समक्ष छायाप्रत नेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यास प्रवेशपत्र/ फोटोसह असलेले ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य राहील.

९) उत्तरपत्रिका छायाप्रत हस्तपोच घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी तशी पोहोच देणे बंधनकारक राहील.

१०) उत्तरपत्रिकेच्या पुनर्मूल्यांकनाची तरतूद नसल्याने पुनर्मूल्यांकन केले जाणार नाही.

११) परीक्षक/ नियामक इ.ची माहिती, माहिती अधिकाराखाली देण्यात येणार नाही.

१२) परीक्षेत गैरमार्गाचा अवलंब केलेल्या विद्यार्थ्यांची चौकशी झाली असल्याने त्याला माहिती अधिकाराखाली त्याच्या उत्तरपत्रिकांची छायाप्रत देण्यात येणार नाही.

१३) संबंधित विद्यार्थ्याने उत्तरपत्रिकेची छायाप्रत अन्य कोणालाही देऊ नये तसेच तिला प्रसिध्दी माध्यमाद्वारे प्रसिध्दी देण्यात येवू नये दिल्यास कारवाईस पात्र राहील.

१४) उत्तरपत्रिकेची छायाप्रत देण्यात येणार असल्याने मूळ उत्तरपत्रिका दाखविली जाणार नाही.

१५) मागणी अर्ज सादर करण्याची मुदत संपल्यानंतर परिस्थितीत शुल्क भरले असले तरीही उत्तरपत्रिकेची छायाप्रत देता येणार नाही. तसेच शुल्क ही परत मिळणार नाही.

१६) ऑनलाईन अर्ज सबमिट झाले नसल्यास त्याची जबाबदारी परिषदेवर राहणार नाही. Successful सबमिट झाल्यावर व त्याचे नाव Screen वर दिसल्यास व विहीत चलनाची प्रत दिसल्यास छायाप्रत देता येईल.

(सुखदेव डेरे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.

## जी.सी.सी. परीक्षा जाने./ फेब्रुवारी - २०१८

### गुणपडताळणीबाबत महत्वाच्या अटी/ शर्ती व सूचना.

१) गुणपडताळणीसाठी प्रती विषय रु.१००/- (शंभर रुपये) शुल्क आकारण्यात येईल.

२) निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून कमाल १० दिवसापर्यंत परिषदेकडे विहित नमुन्यात संबंधित टंकलेखन/ लघुलेखन संस्थेमार्फत ऑनलाईन अर्ज करता येईल. मुदतीनंतर अर्ज भरता येणार नाही. तसेच ऑफलाईन अर्जाचा विचार केला जाणार नाही.

३) एकदा भरलेले शुल्क कोणत्याही सबबीवर परत दिले जाणार नाही.

४) अर्ज अपुर्ण भरलेला असल्यास सबमिट ( submit) होणार नाही.

५) गुणपडताळणी नंतर पुनर्मूल्यांकनाची तरतूद नाही.

६) गैरमार्गाचा अवलंब केलेल्या विद्यार्थ्याला गुणपडताळणी करता येणार नाही.

७) मागणी अर्ज सादर करण्याची मुदत संपल्यानंतरशुल्क भरले असले तरीही कोणत्याही परिस्थितीत उत्तरपत्रिकेची गुणपडताळणी केली जाणार नाही तसेच शुल्कही परत मिळणार नाही.

(सुखदेव डेरे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ४११ ००१